राज्यातील आश्रमशाळांमध्ये दोन वर्षांत ५८४ विद्यार्थ्यांचा मृत्यू

गंभीर आजार, अपघात, नैराश्यातून गळफास, सर्पदंश आदी कारणे; सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर; चौकशीची मागणी

ठाणे : दिलीप शिंदे

राज्यातील अनुदानित व शासकीय आश्रमशाळांमध्ये गेल्या दोन वर्षांत (२०२४ ते २०२६) ५८४ विद्यार्थ्यांचे मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामुळे राज्यभरातील आश्रमशाळांतील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विद्यार्थ्यांचे हे मृत्यू संशयास्पद असून, मृत्यूच्या कारणांमध्ये गंभीर आजार, अपघात, नैराश्यातून गळफास, सर्पदंश, विंचूदंश अशी कारणे देण्यात आली आहेत. मात्र, ही कारणे समाधानकारक वाटत नसल्याने या मृत्यूंच्या चौकशीची मागणी होऊ लागली आहे.

गडचिरोलीतील जपतलाई आश्रमशाळेत नुकत्याच झालेल्या तीन विद्यार्थिनींच्या सर्पदंशाने मृत्यूच्या घटनेनंतर राज्यातील आश्रमशाळांमधील दुरवस्था चव्हाट्यावर आली आहे. आश्रमशाळेच्या सुविधांसाठी होणारी आर्थिक तरतुदीची कमतरता आणि अधिकाऱ्यांचे नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांना जीव गमवावे लागत आहेत. राज्यात दोन वर्षांत सरकारी आश्रमशाळांमध्ये ३८४, तर अनुदानित आश्रमशाळांमध्ये २०० विद्यार्थ्यांनी जीव गमावला आहे. यातील ३६ मृत्यू प्रत्यक्ष शाळा परिसरात, तर उर्वरित विद्यार्थी आजारपणामुळे घरी किंवा रुग्णालयात दगावल्याचे अहवालात नमूद आहे.

या मृत्यूंमागे आश्रमशाळांमधील अस्वच्छता, कुपोषण आणि आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष ही प्रमुख कारणे आहेत. २०१७ मध्ये 'पीडब्ल्यूसी' आणि 'टाटा इन्स्टिट्यूट'ने केलेल्या सर्वेक्षणात आश्रमशाळांमधील गंभीर त्रुटींवर बोट ठेवले होते. दुर्गम भागात असलेल्या या शाळांना संरक्षक भिंत नाही, विद्यार्थ्यांना झोपण्यासाठी खाटा नाहीत, ५० टक्के शाळांमध्ये वर्गखोल्यांचाच वसतिगृह म्हणून वापर होतो आणि स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा मोठा अभाव आहे. जपतलाई आश्रमशाळेतही विद्यार्थिनी जमिनीवर झोपल्यानेच त्यांना सर्पदंश झाला. आजारपणात तातडीच्या उपचारांसाठी बहुतांश शाळांकडे स्वतःची वाहने नसल्याने वेळेवर वैद्यकीय मदत मिळत नाही. हा अहवाल सरकारला देऊनसुद्धा त्यांच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यास प्रशासनाने कानाडोळा केल्याचे दिसून आले आहे.

आरोग्य व पायाभूत सुविधांचा अभाव

महाराष्ट्रात १७ जिल्ह्यांमध्ये आदिवासींची मोठी संख्या असून, त्या जिल्ह्यांमध्ये आश्रमशाळासुद्धा आहेत. 'पीडब्ल्यूसी' या संस्थेने अहमदनगर, अमरावती, धुळे, जळगाव, नागपूर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, रायगड, ठाणे आणि यवतमाळ या ११ जिल्ह्यांतील १५७ आश्रमशाळांमध्ये सर्वेक्षण केले होते. तर गडचिरोली, गोंदिया व चंद्रपूरसारख्या जिल्ह्यांना नक्षलवादी कारवायांमुळे या सर्वेक्षणातून वगळले होते. यामधून आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी आरोग्य आणि पायाभूत सुविधांचा सर्वाधिक अभाव असल्याचे समोर आले.

राज्यात १,०५६ आश्रमशाळांत साडेचार लाख विद्यार्थी

सध्या राज्यात ५०० सरकारी आणि ५५६ अनुदानित आश्रमशाळांमध्ये मिळून साडेचार लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्यासाठी शासनाकडून दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. असे असूनही विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा न मिळणे, हे व्यवस्थेचे मोठे अपयश आहे. शासनाने केवळ कागदी सोपस्कार करण्यापेक्षा ठोस अर्थसंकल्पीय तरतूद करून पायाभूत सुविधांची उभारणी केली नाही, तर निष्पाप विद्यार्थ्यांचे बळी असेच जात राहतील.

अहवालानुसार विद्यार्थ्यांच्या मृत्यूची कारणे

- **गंभीर आजार (२७३ मृत्यू : ४७ टक्के) :** सर्वाधिक मृत्यू आजारपणामुळे झाले आहेत. यामध्ये प्रामुख्याने ताप, अन्नातून विषबाधा, सिकलसेल, कुपोषण आणि इतर संसर्गजन्य आजारांचा समावेश आहे.
- **अपघात (२२८ मृत्यू : ३९ टक्के) :** मृत्यूचे हे दुसरे प्रमुख कारण आहे. यामध्ये रस्ते अपघात आणि तलाव/पाण्यात बुडून झालेल्या मृत्यूंचा समावेश आहे.
- **गळफास/आत्महत्या (५५ मृत्यू : ९ टक्के) :** नैराश्य किंवा इतर अज्ञात कारणांमुळे विद्यार्थ्यांनी गळफास घेतल्याच्या घटना घडल्या आहेत.
- **सर्पदंश-विंचूदंश (२८ मृत्यू : ५ टक्के) :** जंगलाजवळ शाळा असल्याने आणि जमिनीवर झोपावे लागत असल्याने सर्पदंश व विंचूदंशाने हे मृत्यू झाले आहेत.
- ५८४ मृत्यूंपैकी ३६ मृत्यू प्रत्यक्ष शाळेच्या आवारात झाले आहेत, तर उर्वरित ५४८ विद्यार्थी सुट्टीत घरी असताना किंवा रुग्णालयात दगावले आहेत.

महत्त्वाचे

नक्षलींशी ठाकरेंची जवळीक : शेलार

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

गणेशमूर्ती तयार करण्यापासून ते त्यांचे विसर्जन, गणेशोत्सवातील सजावट, रोषणाई आणि उत्सवाच्या विविध परंपरांवर सातत्याने आक्षेप घेत मर्यादा आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रवृत्तींपासून मुंबईकरांनी सावध राहावे. मराठी उत्सवांवर आक्षेप घेत त्या बंद पाडण्यासाठी 'दिमागी नक्षली' अनेक वर्षांपासून प्रयत्नरत आहेत. अशा दिमागी नक्षलींसोबत आदित्य ठाकरे यांचा संवाद वाढलाय का, असा प्रश्न करत भाजप नेते आणि मंत्री आशिष शेलार यांनी ठाकरेंच्या काळात उत्सवांवर निर्बंध आणले गेल्याचा आरोप केला. पीओपी प्रश्नी एकजूट दाखवल्याबद्दल सर्व संबंधितांचे शेलार यांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेत आभार मानले.

आता ड्रोन 'डाकिया'

पान १ वरून... टपाल कार्यालये ही केवळ पत्रव्यवहारापुरती मर्यादित नसून पेन्शन, बँकिंग, बचत योजना, विमा आणि इतर सरकारी सेवांचा मुख्य आधार आहेत. रस्ते वाहतुकीतील अडचणींवर मात करून ड्रोनद्वारे थेट बॅगा पोहोचवल्यामुळे या सर्व नागरी सेवा अधिक जलद आणि वेळेवर उपलब्ध होणार आहेत. केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील दळणवळण सुलभ करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

हिमाचल, आसाममध्ये नेटवर्कचा विस्तार

या पथदर्शी प्रकल्पाचा विस्तार लवकरच मोठ्या प्रमाणावर केला जाणार आहे. त्यानुसार हिमाचल प्रदेशातील ११० आणि आसाममधील ४० मार्गांवर ही सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे. आसाममध्ये गुवाहाटी विभागातील हाजो उप-टपाल कार्यालयातून या सेवेची सुरुवात झाली असून एकट्या हाजो भागातून ८२ किलोमीटरचे नऊ मार्ग निश्चित करण्यात आले आहेत.

खार जिमखाना, नोवारा, बजरंग स्वीटवर कारवाई

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

अन्नपदार्थांची स्वच्छता, सुरक्षित साठवणूक आणि अन्न हाताळणीच्या नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या मुंबईतील चार आस्थापनांवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कारवाईचा बडगा उगारला आहे. खार जिमखाना, मालाडमधील नोवारा, सांताक्रूझमधील बजरंग स्वीट मार्ट आणि अंधेरीतील एएसएम हॉटेल्स अँड हॉस्पिटॅलिटी सर्व्हिसेस यांच्या तपासणीत अन्नसुरक्षा व स्वच्छतेशी संबंधित गंभीर त्रुटी आढळल्या. संबंधित परवाने किंवा नोंदणी प्रमाणपत्र निलंबित करण्यात आले आहे.

मुंबईत एफडीएचे धाडसत्र सुरूच

खार जिमखाना : १३ वा रोड, खार (पश्चिम) येथे अन्नपदार्थ, पॅकेजिंग साहित्य, रसायने आणि अन्य वस्तूंच्या साठवणुकीसाठी पुरेशी व योग्य व्यवस्था नसल्याचे आढळले. नोंदणी प्रमाणपत्र दर्शनी भागात नव्हते. अन्नपदार्थांची आवश्यक चाचणी केली जात नसल्याचेही निदर्शनास आले. स्वयंपाकघरातील अन्न तयार करण्याचा परिसर अस्वच्छ होता. कच्चे आणि तयार तसेच शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थ वेगळे ठेवले जात नव्हते. उपकरणांचे योग्य निर्जंतुकीकरण केले जात नव्हते.

गोठवलेल्या अन्नपदार्थांचे सुरक्षित पद्धतीने वितळवणे केले जात नव्हते. अन्नसाठ्यात आधी आलेला माल आधी वापरणे (एफआयएफओ) आणि ज्याची मुदत आधी संपते तो माल आधी वापरणे (एफईएफओ) या पद्धतींचे पालन होत नव्हते. सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्यांमध्ये तेलकट पदार्थ अडविणारी जाळी आणि झुरळ प्रतिबंधक सापळ्यांचीही कमतरता होती.

नोवारामध्ये १४ त्रुटी कायम : मालाड पश्चिमेतील इंजिनिअस किचन्स प्रा. लि. (नोवारा) येथे ३ जुलै रोजी झालेल्या तपासणीत त्रुटी आढळल्यानंतर सुधारणा नोटीस देण्यात आली होती. मात्र, १३ ऑगस्टच्या पुनर्तपासणीत नोटिसमधील २५ गंभीर त्रुटींपैकी १४ त्रुटींची पूर्तता झालेली नसल्याचे आढळले. स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या तेल किंवा तुपाबाबत आवश्यक माहिती देणारा फलकही लावलेला नव्हता. वारंवार सूचना देऊनही त्रुटी दूर न झाल्याने १९ ऑगस्टपासून निलंबित करण्यात आला.

बजरंग स्वीट मार्ट : सांताक्रुझ पश्चिमेतील बजरंग स्वीट मार्टची १९ ऑगस्ट रोजी तपासणी करण्यात आली. अन्नसुरक्षा निकषांच्या तपासणीत आस्थापनाला ८६ पैकी केवळ ४० गुण, म्हणजे ४७ टक्के अनुपालन मिळाले.

आस्थापनात एफएसएसएआय परवाना दर्शनी भागात लावलेला नव्हता. भिंती, छत आणि इतर ठिकाणचा रंग व प्लास्टर उखडलेले होते. फरशीची स्थितीही अन्नसुरक्षा निकषांनुसार नव्हती. काही उपकरणे व डबे गंजलेले, तर काही फरशा तुटलेल्या आढळल्या.

वापरातील पिण्याच्या पाण्याची निर्धारित मानकांनुसार तपासणी झाल्याच्या नोंदी नव्हत्या. कच्च्या मालासाठी पुरेशी साठवणूक व्यवस्था नव्हती. कर्मचाऱ्यांसाठी वैयक्तिक स्वच्छतेच्या सुविधांमध्ये त्रुटी होत्या. अन्नपदार्थांच्या प्रयोगशाळा तपासणीच्या नोंदीही उपलब्ध नव्हत्या.

कच्चे, शिजविलेले, शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थांचे योग्य विभाजन केले जात नव्हते. उपकरणांचे योग्य निर्जंतुकीकरण होत नसल्याचेही आढळले.

या गंभीर त्रुटींप्रकरणी एफडीएकडून नियमानुसार परवाना निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

एएसएम हॉटेल्समध्ये स्वच्छता निकषांचा भंग

अंधेरी पश्चिमेतील एम. एस.एम. हॉटेल्स अँड हॉस्पिटॅलिटी सर्व्हिसेस प्रा. लि. येथे २० ऑगस्ट रोजी तपासणी करण्यात आली. एसव्हीपी नगर, म्हाडा वसाहत परिसरातील या आस्थापनात अन्नसुरक्षा व स्वच्छतेच्या निर्धारित निकषांचे पालन होत नसल्याचे आढळले.

विशेषतः अन्न सुरक्षा व मानकांच्या नियमांमधील अनुसूची-४ अंतर्गत अन्न हाताळणी, साठवणूक, स्वच्छता आणि परिसराच्या देखभालीसंबंधी नियमांचे उल्लंघन निदर्शनास आले. गंभीर त्रुटींची दखल घेत संबंधित आस्थापनाचा अन्न व्यवसाय परवाना निलंबित करण्यात आला.

निलंबनाच्या काळात संबंधित चारही आस्थापनांना आदेशानुसार अन्नपदार्थांची खरेदी, उत्पादन, साठवणूक, विक्री किंवा वितरण करता येणार नाही. आदेशाचे उल्लंघन करून व्यवसाय सुरू ठेवल्यास अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा एफडीएने दिला आहे.

संक्षिप्त

मराठी न येणाऱ्या रिक्षा-टॅक्सीचालकांवर तीन टप्प्यांत कारवाई

मुंबई : महानगर क्षेत्रात ३ हजार ९९५ वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६०४ चालकांना व्यवहारिक मराठीचे पुरेसे ज्ञान नसल्याचे आढळून आले.

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

मराठीचे जुजबी ज्ञान नसणाऱ्या रिक्षा - टॅक्सी चालकांना पहिल्याच दिवशी परिवहन विभागाने दणका दिला आहे. मुंबई, ठाणे सह राज्यभरात १ हजार २६८ टॅक्सी-रिक्षा चालकांना शिकण्यासाठी नोटीस बजावत त्यांना मराठी शिकण्यासाठी महिनाभराची मुदत देण्यात आली आहे. महाराष्ट्रात टॅक्सी आणि रिक्षा चालकांना व्यवहारिक मराठीचे ज्ञान अनिवार्य करण्यात आले आहे. या नियमाची गुरुवारपासून राज्यभरात अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. अंमलबजावणीच्या पहिल्याच दिवशी रिक्षा, टॅक्सी चालकाची तपासणी करत त्यांना मराठी येते का नाही याची पाहणी करण्यात आली. त्यामध्ये मराठी न येणाऱ्या तब्बल १,२६८ चालकांना परिवहन विभागाने नोटिसा बजावल्या. त्यांना मराठी शिकण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे. नियम न पाळल्यास चालकाचा बॅज तीन महिन्यांसाठी निलंबित केला जाणार आहे.

- **परिवहन विभागाच्या माहितीनुसार, तीन टप्प्यांत ही कारवाई केली जाणार असून, पहिल्या टप्प्यात तपासणीत मराठीचे ज्ञान नसल्याचे आढळल्यास चालकाला नोटीस दिली जाईल.**

दुसऱ्या टप्प्यात नोटीस मिळाल्यानंतर एका महिन्याच्या आत चालकाला व्यवहारिक मराठी शिकणे बंधनकारक असेल.

- **तिसऱ्या टप्प्यात मुदतीत मराठीचे ज्ञान सिद्ध न केल्यास संबंधित चालकाचा बॅज ३ महिन्यांसाठी निलंबित करण्यात येईल. ही तपासणी मोहीम ३० सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. या कालावधीत सर्व व्यावसायिक वाहनचालकांची व्यवहारिक मराठीच्या ज्ञानासाठी तपासणी केली जाणार आहे.**

दरम्यान रिक्षा टॅक्सीचालकांना मराठी शिकण्यासाठी पुरेसा कालावधी दिला जात आहे. मात्र दिलेल्या मुदतीनंतरही नियमाचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले.

शुद्धीपत्रक सूचना

२१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रकाशित झालेल्या जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनाधीन) सूचनेमध्ये, पुढारी , **मुंबई** आवृत्तीमध्ये, मालमत्ता वर्णन **मध्ये मालमत्तेचा आयडी चुकीचा (४२११)** प्रकाशित केला आहे, मालमत्ता वर्णन **मध्ये मालमत्तेचा आयडी (4122)** बरोबर आहे.
वरील सूचनेतील उर्वरित मजकूर तसाच राहील
संपादित/-
सही /-
सतीश कुमार गुप्ता
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडचे लिक्विडेटर
ईमेल – liquidation.jet@gmail.com

भाजपच्या नबीन टीमची आज बैठक

नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा

भाजपच्या नवगठित राष्ट्रीय टीमची पहिली परिचयात्मक बैठक शनिवारी (दि. २२) नवी दिल्ली येथे होत आहे. राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत पक्षाचे नवनियुक्त राष्ट्रीय पदाधिकारी पहिल्यांदाच एकत्र येऊन संघटनेच्या आगामी कार्यक्रमांसह राष्ट्रीय स्तरावरील पक्षाच्या हालचालींबाबत सविस्तर चर्चा करतील. बैठकीचा मुख्य अजेंडा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक आयुष्याची २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित केल्या जाणाऱ्या 'मोदी@२५' कार्यक्रमांची रूपरेषा ठरवणे हा आहे.

पॉक्सो गुन्हा दाखल करण्यास पालघर पोलिसांची चालढकल

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

पालघर येथील १० वर्षीय अल्पवयीन मुलीवरील कथित लैंगिक अत्याचार तक्रार प्रकरणी पोलीस महासंचालक कार्यालयाने पालघर पोलीस अधीक्षकांना आवश्यक कार्यवाही करावी असे निर्देश दिले आहेत.मात्र ;तरीही अद्याप पालघर पोलीसांनी गुन्हा दाखल केलेला नाही.या प्रकरणात पोलीस चालढकल करीत आहे,असा आरोप पीडीत कुटूंबाने शुक्रवारी केला.याविषयी मुंबई प्रेस क्लब येथे कुटूंबाची पत्रकार परिषद झाली.

पीडीत अल्पवयीन मुलीवर २१ जुलै २०२६ ला लैगिक अत्याचार झाला आहे.त्यानंतर आपत्तकालीन ११२ क्रमांकावरही संपर्क साधण्यात आला.या संपर्काची नोंद आहे.तसेच ४ ऑगस्टला कथित लैंगिक अत्याचाराबाबत माहिती पालघर पोलीसांना दिली.या घटनेनंतर अल्पवयीन मुलीची पालघर ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय तपासणी झाली.मात्र ;पालघर पोलीसांनी याची तक्रार दाखल करण्यासाठी गेलो असता दखल घेतली नाही. त्यामुळे पोलीस महासंचालकाकडे १४ आॅगस्टला सविस्तर तक्रार केली.यामध्ये घटनेची माहिती,पोलिसांशी केलेला संपर्क, ११२ क्रमांकाचा संदर्भ आणि वैद्यकीय तपासणीसंदर्भातील कागदपत्रांची माहिती देण्यात आली.

पीडित कुटुंबाचा आरोप

चार दिवस वाट पाहिल्यानंतर १९ ऑगस्टला पोलीस महासंचालक कार्यालयाला ई-मेलद्वारे निवेदन पाठविले. त्यावर याच दिवशी महासंचालक कार्यालयाने याची दखल घेत संबंधित ई-मेल हा पालघर पोलीस अधीक्षक यांच्याकडे पाठविला.त्यामध्ये या प्रकरणात आवश्यक कारवाई करावी व त्यानुसार तक्रारदाराला कळवावे,असे निर्देश पोलीस महासंचालक कार्यालयाने पालघर पोलिसांना दिले.

पण ;त्यानंतरही पोलीसांनी याकडे दुर्लक्ष केले आहे.आम्हाला न्याय हवा आहे व दोषींवर कडक कारवाइ व्हावी,या प्रकरणात एफआयआर दाखल करून निष्पक्ष तपास करावा, मुलीला संरक्षण मिळावे व तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीची लेखी माहिती द्यावी, अशी मागणी केली असल्याचे पीडित कुटुंबाने सांगितले.

वडिलोपार्जित मालमत्तेतील हक्क तोंडी सोडणे कायदेशीरदृष्ट्या वैध

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

कुटुंबातील सदस्याने वडिलोपार्जित मालमत्तेतील आपला हिस्सा तोंडी सोडणे कायदेशीरदृष्ट्या वैध आहे आणि त्यासाठी लेखी दस्तऐवज असणे नेहमीच बंधनकारक नाही. मात्र, महसूल नोंदींमधून नाव कमी करण्यासाठी सही केलेल्या संमतीपत्रावरून किंवा प्रतिज्ञापत्रावरून त्या व्यक्तीने मालकी हक्क कायमचा सोडून दिला आहे, असा पूर्वग्रह गृहीत धरता येणार नाही, असा निर्णय उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय

शेखर जोशी आणि अनिता भावे या भाऊ-बहीणीच्या वादावर न्यायमूर्ती संदीप मारणे यांनी सुनावणी घेतली. रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथील गट क्रमांक २७ मधील जमीन आणि घर या त्यांच्या वडिलोपार्जित मालमत्ता आहेत. वडिलांच्या निधनानंतर महसूल रेकॉर्डवर बहीण अनिता यांच्या नावाचा समावेश करण्यात आला होता. परंतु नंतर एका प्रतिज्ञापत्राच्या आधारे तिचे नाव महसूल नोंदीतून हटवले गेले. बहिणीने तिचा हिस्सा तोंडी सोडून दिला होता आणि म्हणून तिचे नाव सातबारा /महसूल नोंदीतून कमी करण्यात आले, असा दावा भावाने केला होता.

२०१३ मध्ये त्यांच्या आईनेही आपला हिस्सा मुलाच्या नावावर करून दिला. यानंतर बहिणीने २०१५ मध्ये अलिबाग न्यायालयात धाव घेत मालमत्तेत हक्काची मागणी करणारा दावा दाखल केला. भावाने बहिणीला हिस्सा देण्यास विरोध करत उच्च न्यायालयात अपील केले होते. ते उच्च न्यायालयाने फेटाळून लावले.

राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई.
दूरध्वनी क्र. २२७ १७५००

जाहीर ई-निविदा सुचना क्र.०१/२०२६-२७

राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई हे राष्ट्रीय आरोग्य अभियान, पासुविक, अंतर्गत मंजूर दुरुस्ती व बांधकामे खाली दर्शविल्याप्रमाणे Online निविदा http:/ mahatenders.gov.in वर ई-टेंडरिंग पध्दतीने मागवित आहे.

ई-निविदा (प्रथम प्रसारण) कामांची संख्या-०१
ऑनलाईन निविदा विक्री - दिनांक २२/०८/२०२६.

आरोग्य संस्थेच्या बंधकामे व दुरुस्तीचे खालीलप्रमाणे Online ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन Tender by organization मधील SE National Rural Health Mission State Health Society Mumbai वरुन डाउनलोड करता येईल. या निविदे संबंधिची सर्व माहिती व अटी / शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. ही निविदा फक्त इंटरनेट-वरुनच खरेदी करता येईल व इंटरनेटवरुनच भरता / दाखल करता येईल. कोणतेही कारण न देता निविदा स्विकारणे अथवा रद्द करणेचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत.

राज्य आरोग्य सोसायटी,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, मुंबई

पश्चिम रेल्वे

सुधारणा, स्थापित करणे, फिटमेंट, चाचणी आणि सुरू करून देण्याची कामे

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (रोलिंग स्टॉक), ईएमयू कारशेड मुंबई सेंट्रल विभाग पश्चिम रेल्वे, मुंबई-४०००३४ हे **ई-निविदा सूचना क्र. : डीआरएम/आरएस/क्यूटीएस/२०२६-२७/०८ दिनांक १८/०८/२०२६** मागवत आहेत. **कामाचे नाव :** ७००१-७००४, ७१०५-७१०६ आणि ७१०९-७११० एसी ईएमयू रेकच्या आरएमपीयू फिल्टर चेंबर पॅनेल वरील त्वरीत-सोडणारे क्लॅम्प्समध्ये सुधारणा, स्थापित करणे, फिटमेंट, चाचणी घेणे आणि सुरू करून देणे. **कामाचे अंदाजे मूल्य :** ₹ ३,३६,३००/- **बयाणा रक्कम :** ₹ ६,७२६/- **प्रस्तुतीकरणाचा दिनांक आणि वेळ :** विहित नमुन्यात १५.०९.२०२६ च्या १५.०० पर्यंत **खुले होण्याचा दिनांक आणि वेळ :** १५.०९.२०२६ रोजी १५.३० वाजता. वेबसाईट तपशील : निविदा वेबसाईट **www.ireps.gov.in** च्या माध्यमातून पाहता आणि प्रस्तुत करता येईल. 0500

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

मध्य रेल्वे

निविदा आमंत्रण सूचना

वरिष्ठ डी.सी.एम./सी.एस.एम.टी. हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या करिता खालील ठिकाणच्या रेल्वे जमिनीवर मालवाहतूक संबंधित सुविधा (सी.आर.एफ.) च्या विकास आणि संचालनासाठी ई-निविदा मागवत आहेत. बोलीदारांना त्यांच्या मूळ/सुधारित बोली केवळ अंतिम तारीख आणि वेळेपर्यंत सादर करता येतील. या निविदेसाठी मॅन्युअल (हस्तलिखित) प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत आणि असा कोणताही मॅन्युअल प्रस्ताव प्राप्त झाल्यास तो दुर्लक्षित केला जाईल. बोलीदारांना अधिक माहितीसाठी **www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला भेट देण्याची विनंती केली जात आहे.

कामाचे नाव	रेल्वे जमिनीवर मालवाहतूक संबंधित सुविधा (सी.आर.एफ.)च्या विकास आणि संचालनाचे कंत्राट एक		
निविदा क्र.	ठिकाण	राखीव मूल्य	बयाणा रक्कम जमा
बीबी-सी-१३०-डब्ल्यूए-सीआरएफ-एमएलएनडी	मुलुंड	रु. ७३,४९,६९,४००/-	रु. २७,१९,४००/-
बीबी-सी-१३०-डब्ल्यूए-सीआरएफ-उरण	उरण	रु. ७३,४९,६९,४००/-	रु. ५०,००,०००/-
बीबी-सी-१३०-डब्ल्यूए-सीआरएफ-केएलएमजी	कळंबोली	रु. ७२,७०,००,०००/-	रु. ४२,२२,१००/-
बीबी-सी-१३०-डब्ल्यूए-सीआरएफ-टीयूएच-ए	तुर्भे जागा अ	रु. १८,५४,१३,४२६/-	रु. २७,५१,६००/-
बीबी-सी-१३०-डब्ल्यूए-सीआरएफ-टीयूएच-बी	तुर्भे जागा ब	रु. १२,९१,२८,५६३/-	रु. १९,१६,३००/-
बीबी-सी-१३०-डब्ल्यूए-सीआरएफ-टीयूएच-सी	तुर्भे जागा क	रु. ५,२९,४२,७११/-	रु. ७,८५,७००/-
निविदा बंद होण्याची तारीख व वेळ	२२/०९/२०२६ १५:०० वाजता	(निविदापूर्व) परिषदेची तारीख व वेळ	०४/०९/२०२६ १५:०० वाजता

संबंधित निविदेबाबत पुढील कोणतीही जोडपत्रे/शुद्धीपत्रके, निविदा मागे घेणे, तारखेत बदल, वेळेची मुदतवाढ, स्पष्टीकरण इत्यादी बाबी असल्यास त्या फक्त संकेतस्थळावर अपलोड केल्या जातील. बोलीदारांनी अपडेट राहण्यासाठी नियमितपणे संकेतस्थळाला भेट द्यावी. 494

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा.

मध्य रेल्वे

विविध कामे

ई-निविदा सूचना क्र. आरआर/पीआर/एसएनपीडी/३५१/२५-२६/५२ १. कामाचे नाव : ईएमयू पीओएच कार्यशाळा सानपाडा येथे मेधा, ऑटोमीटर आणि लॅक्सव्हेन बनावटीच्या स्पीडोमीटरच्या स्पीडोमीटर चाचणी बेंचचा विकास, पुरवठा, स्थापित करणे, सुरू करणे आणि चाचणी घेणे **२. कामाचे अंदाजे मूल्य :** रू. ९७८९२८ **३. बयाणा रक्कम :** रू. १९६०० **४. निविदा अर्जाचे मूल्य :** काही नाही **५. पूर्णत्वाचा कालावधी :** ०३ महिने **६. निविदा प्रस्तुती बंद होण्याचा दिनांक आणि वेळ :** ११/०९/२०२६ रोजी १३.३० वाजता **७. बोली प्रारंभ दिनांक :** २८/०८/२०२६ **८.** निविदा वेबसाईट **www.ireps.gov.in** च्या माध्यमातून केवळ ई-निविदा प्रारूपातच स्वीकारले जातील. निविदा दस्तावेज वेबसाईटवर उपलब्ध आहे. 490

सुरक्षितपणे प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मुख्य कार्यालय, विरार
विरार (प.),
ता. वसई, जि. पालघर-401 303

दूरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250 - 2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जावक क्र. : व.वि.श.म/मा.तं./180/26-27
दिनांक : 21/08/2026

वसई-विरार शहर महानगरपालिका

जाहीर नोटीस

वसई-विरार शहर महानगरपालिकेअंतर्गत गणेश विसर्जनाकरीता तलाव/कृत्रिम तलावांवर भाडेतत्त्वावर सी.सी.टी.व्ही यंत्रणा कार्यान्वित करणेकामी चालू शासकीय दर उपलब्ध नसल्यामुळे खुल्या बाजारातून दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदरकामी विस्तृत माहिती **www.vvcmc.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर कामाकरीता दि. २५/०८/२०२६ रोजी संध्या. ०४.०० वाजेपर्यंत वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्य कार्यालय, माहिती तंत्रज्ञान विभाग, यशवंत नगर, विरार (प.) येथे सोबत जोडलेल्या दरपत्रकातील बाबींकरीता दर भरुन देण्यात यावेत.

सही/-
(हर्षला राणे)
उपायुक्त
माहिती तंत्रज्ञान विभाग
वसई-विरार शहर महानगरपालिका

कायदा अन् राजकारणाच्या कोंडीत 'वंदे मातरम्'!

नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा

स्वातंत्र्यलढ्यात राष्ट्रभावनेची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या 'वंदे मातरम्'वरून काँग्रेस आणि भाजपमध्ये पुन्हा राजकीय रणकंदन सुरू झाले आहे. काँग्रेसने पक्षाच्या कार्यक्रमांत गीताची पहिली दोन कडवीच म्हणण्याची १९३७ पासूनची परंपरा कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे, भाजप संपूर्ण गीताचा आग्रह धरत आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात 'वंदे मातरम्'च्या गायनाला कायदेशीर संरक्षण देणारे विधेयक मंजूर झाले असतानाच या वादाला कायदेशीर व राजकीय असे दोन्ही आयाम प्राप्त झाले आहेत.

'वंदे मातरम्'ची रचना बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी केली. पुढे 'आनंदमठ' कादंबरीचा भाग बनलेले हे गीत स्वदेशी आंदोलनासह स्वातंत्र्यलढ्याचे प्रभावी प्रतीक ठरले. १८९६ च्या काँग्रेस अधिवेशनात रवींद्रनाथ टागोर यांनी ते गायले होते.

काँग्रेसचा दोन कडव्यांचा निर्णय

१९३७ मध्ये काँग्रेस कार्यकारिणीने राष्ट्रीय कार्यक्रमांत 'वंदे मातरम्'ची पहिली दोन कडवी गाण्याची शिफारस केली. सुरुवातीच्या कडव्यात मातृभूमीचे निसर्गसौंदर्य, समृद्धी व वैभव यांचे तर पुढील कडव्यात मातृभूमीचे दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती यांसारख्या हिंदू देवींच्या प्रतिमांशी साधर्म्य असलेले वर्णन येते. काही मुस्लिम नेत्यांच्या आक्षेपानंतर सर्व समुदायांना स्वीकारता येईल, अशा पद्धतीने पहिली दोन कडवी वापरण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जाते. महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू व रवींद्रनाथ टागोर यांच्या